प/९३

RNI No. MAHBIL /2009/35530

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार

वर्ष १, अंक १८] सोमवार, जून १, २०१५/ज्येष्ठ ११, शके १९३७ [पृष्ठे ३, किंमत : रुपये २३.००

### असाधारण क्रमांक ३०

### प्राधिकृत प्रकाशन

**महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम.**

अनुक्रमणिका

| | पृष्ठे |
|---|---|
| **सन २०१५ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक ८.**—महाराष्ट्र सागरी मासेमारी नियमन अधिनियम, १९८१ यात सुधारणा करण्यासाठी अध्यादेश | १–३ |

### कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग

मंत्रालय, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मुंबई ४०० ०३२, दिनांक १ जून २०१५.

### MAHARASHTRA ORDINANCE No. VIII OF 2015.

AN ORDINANCE

TO AMEND THE MAHARASHTRA MARINE FISHING REGULATION ACT, 1981.

### सन २०१५ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक ८.

**महाराष्ट्र सागरी मासेमारी नियमन अधिनियम, १९८१ यात सुधारणा करण्यासाठी अध्यादेश.**

**ज्याअर्थी,** राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांचे अधिवेशन चालू नाही ;

१९८१ चा महा. ५४. **आणि ज्याअर्थी,** यापुढे दिलेल्या प्रयोजनांसाठी, महाराष्ट्र सागरी मासेमारी नियमन अधिनियम, १९८१ यात सुधारणा करण्यासाठी महाराष्ट्राच्या राज्यपालांनी तात्काळ कार्यवाही करणे जीमुळे आवश्यक व्हावे अशी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल त्यांची खात्री पटली आहे ;

**त्याअर्थी, आता,** भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद २१३ च्या खंड (१) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करुन, महाराष्ट्राचे राज्यपाल, याद्वारे, पुढील अध्यादेश प्रख्यापित करीत आहेत :—

संक्षिप्त नाव व प्रारंभ.

**१.** (१) या अध्यादेशास, महाराष्ट्र सागरी मासेमारी नियमन (सुधारणा) अध्यादेश, २०१५ असे म्हणावे.

(२) तो, तात्काळ अंमलात येईल.

सन १९८१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५४ याच्या कलम २ ची सुधारणा.

**२.** महाराष्ट्र सागरी मासेमारी नियमन अधिनियम, १९८१ (यात यापुढे ज्याचा निर्देश " मुख्य अधिनियम " असा करण्यात आला आहे) याच्या कलम २ मध्ये, खंड (आय) ऐवजी, पुढील खंड दाखल करण्यात येईल :— १९८ महा

" (आय) " नोंदणी अधिकारी " याचा अर्थ, सहायक मत्स्यव्यवसाय आयुक्त, असा आहे, आणि त्यामध्ये, राज्य शासनाने, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, तीत विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा क्षेत्रासाठी, ज्या कोणत्याही अधिकाऱ्यास, या अधिनियमाद्वारे, नोंदणी अधिकाऱ्याला प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करण्यासाठी आणि त्यावर सोपविलेली कर्तव्ये पार पाडण्यासाठी, प्राधिकृत केले असेल अशा इतर कोणत्याही अधिकाऱ्याचा समावेश होईल ;".

सन १९८१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५४ याच्या कलम १३ ची सुधारणा.

**३.** मुख्य अधिनियमाच्या कलम १३ मधील पोट-कलम (१) मध्ये, " राज्य बंदर संघटनेच्या मुख्य बंदर अधिकाऱ्याकडे " या मजकुराऐवजी " मत्स्यव्यवसाय आयुक्त, महाराष्ट्र शासन याच्याकडे " हा मजकूर दाखल करण्यात येईल.